दैनिक दिव्य मराठी
दिव्य सिटी
बुलडाणा. रविवार, २५ ऑगस्ट २०१३

# चिखलीत हरितपर्व वृक्षदिंडी उत्साहात

प्रतिनिधी | चिखली

श्री शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेनेच्या संयुक्त विद्यमाने हरितपर्व-२०१३ अंतर्गत नुकतीच वृक्षदिंडी काढण्यात आली. महाविद्यालय परिसरात एक व्यक्ती एक वृक्ष लावण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. त्यानुषंगानेच ही दिंडी काढण्यात आली. यशस्वीतेसाठी प्रा. के. डी. पेन्शनवार, प्रा. डॉ. डी. बी. बोबडे, डॉ. एम. बी. सोनुने, डॉ. व्ही. यू. पोच्छी, प्रा. जी. एम. डोंगरे, प्रा. डी. जे. कांदे यांनी पुढाकार घेतला होता.

# रासेयोतर्फे 300 वृक्ष लागवड

**चिखली** | येथील श्री. शिवाजी विज्ञान व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या परिसरात ३०० वृक्षांची लागवड केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. भुसारी यांच्या मार्गदर्शनाखाली एक वृक्ष एक सेवक या संकल्पनेतून हा उपक्रम हाती घेण्यात आला. कडुनिंब, गुलमोहर, जागरंडा, पिंपळ, वड, बांबू या वृक्षांची यामध्ये लागवड करण्यात आली. वृक्षारोपण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थ्यांनी पुढाकार घेतला.